# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, सोमवार , दिनांक २६ जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३३४ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- -वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये

## माहुलकर, पोटे, बाराभाई, हाते यांना पोलिस पदक जाहीर



विजय माहुलकर | पराग पोटे | कैलास बाराभाई | राजू हाते

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २५**

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्रीय मंत्रालयाच्या वतीने राष्ट्रपती पोलिस पदकांची घोषणा करण्यात आली असून महाराष्ट्रातील ७५ पोलिसांना विविध पदके जाहीर झाली. त्यात ३१ पोलिसांना शौर्य पदक, ४ पोलिस अधिकाऱ्यांना राष्ट्रपती विविष्ट सेवा पदक, तसेच ४० पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी विशेष सेवा पदक जाहीर झाले आहे. त्यात नागपुरातील अतिरिक्त अधीक्षक विजयकुमार माहुलकर, काटोलचे उपविभागीय पोलिस अधिकारी पराग पोटे, पो. नि. कैलास बाराभाई आणि कारागृह हवालदार राजू हाते यांचा समावेश आहे. पोलिस दलात नागपूरच्या गौरवाची परंपरा राखणारे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अतिरिक्त अधीक्षक विजयकुमार माहुलकर हे १९९३ साली पोलिस उपनिरीक्षक म्हणून पोलिस खात्यात दाखल झाले. गुन्ह्यांची उकल करण्यात त्याचा हातखंडा आहे. मालमत्तेचे गुन्हे, संपूर्ण राज्यात ट्रकद्वारे अंमली पदार्थांची वाहतूक करणाऱ्या टोळ्यांचा बंदोबस्त त्यांनी केला.
त्यांच्या कामगिरीची दखल घेत त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना आतापर्यंत बेस्ट डिटेक्शन रिकव्हरी, राज्य सरकारचा पुरस्कार, दोन यूएन पदके आणि पोलिस महासंचालकांच्या सन्मानचिन्हाचा समावेश आहे. शोधकार्य, कायद्याची अंमलबजावणी, गुन्हे प्रतिबंध, आपत्कालिन प्रतिसाद आणि मदत सेवांमध्ये उत्कृष्ट कार्य केले आहे. वाहतूक शाखेचे प्रभारी असताना त्यांनी अपघाती मृत्यू कमी करणे, अपघातप्रवण क्षेत्र कमी करणे आणि वाहतूक नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे अशी कौतुकास्पद कामगिरी केली आहे. नागपूर ग्रामीणचे पो. नि. कैलास बाराभाई हे १९८६ साली पोलिस दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान विभागात सहायक पोलिस उपनिरीक्षक म्हणून रूजू झाले.

सध्या ते नागपूर ग्रामीण पोलिस दलात कार्यरत आहेत. त्यांच्या अविस्मरणीय सेवेबद्दल त्यांना २०२५ साली पोलिस महासंचालकांचे सन्मानचिन्ह मिळाले. त्यांनी आपल्या सेवेतील १३ वर्षे गडचिरोलीच्या दुर्गम आणि नक्षलग्रर्दी भागात सेवा केली असून, त्यांच्या या समर्पित कार्याबद्दल त्यांना २०१२ मध्ये खडतर सेवा पदक आणि २०१५ मध्ये अंतर्गत सुरक्षा पदक प्रदान करण्यात आले. २०१६ मध्ये पोलिस बिनींारी संवाद प्रणाली ॲनालॉगवरून डिजिटल मोडमध्ये रुपांतरीत करण्यात आली. नक्षलग्रस्त भागात विविध वायरलेस मास्ट आणि रिपीटर स्टेशन उभारण्यात आले. काटोलचे पोलिस उपविभागीय पोलिस अधिकारी पराग पोटे यांनाही गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक जाहीर झाले.

**राजू हाते**

नागपूर मध्यवर्ती कारागृह सेवेत उत्कृष्ट कामगिरी आणि सेवेबद्दल राजू हाते यांना राष्ट्रपती कारागृह व सुधार सेवा पदक जाहीर झाले. यापूर्वी २०१८ मध्ये हाते यांना राष्ट्रपतींचे प्रशंसनिय सेवा पदक मिळाले होते.

## पद्मश्री पुरस्काराची घोषणा

# खेडकर, फर्नांडीस, लाड यांना पद्मश्री

**वृत्तसंस्था**
**नवी दिल्ली, दि. २५**

विविध क्षेत्रात अतुलनीय आणि उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल प्रजासत्ताक दिनाच्या आदल्या दिवशी पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून त्यात महाराष्ट्रातील रघुवीर खेडकर, अर्मिडा फर्नांडिस आणि श्रीरंग लाड पद्मश्री देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे चित्रपटसृष्टीत महत्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल सिने कलावंत धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण जाहीर करण्यात आला.

पद्मश्री, पद्मविभूषण आणि पद्मभूषण अशा तीन प्रकारांमध्ये हे पुरस्कार भारतातील सर्वात मानाचे पुरस्कार समजले जातात. कला, समाजसेवा, प्रशासन, विज्ञान, व्यापार, उद्योग, साहित्य, शिक्षण आणि क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींसह विविध क्षेत्रांमध्ये




उत्तम योगदान देणाऱ्या व्यक्तींना हे पुरस्कार देण्यात येतात. केंद्र सरकारने नुकत्याचे केलेल्या घोषणेनुसार महाराष्ट्रातील लोकनाट्य कलाकार रघुवीर खेडकर यांना पद्मश्री पुरस्कार देण्यात आला. याशिवाय महाराष्ट्रातील अर्मिडा फर्नाडिस आणि परभणीचे श्रीरंग लाड यांनाही पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. फर्नांडिस यांनी वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी केली आहे. श्रीरंग लाड हे शेतकरी आहेत.

त्यांनी कापूस पिकाच्या उत्पन्न वाढीसाठी विशेष संशोधन केले आहे. त्यांच्याच कामाची दखल घेत केंद्र सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर केला आहे. सोबतच महाराष्ट्रातीलच भिकल्या लाडक्या धिंडा यांना देखील पद्म पुरस्कार जाहीर करण्यात आला.

सिनेसृष्टीत महत्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल कला क्षेत्रातील गौरवाबद्दल धर्मेंद्र यांना पद्मविभूषण या सन्मानाने गौरविण्यात आले. सोबतच राजकीय क्षेत्रासाठी शिबू सोरेन, जाहीरात लेखक पीयुष पांडे यांनाही मरणोत्तर पद्मविभूषण जाहीर करण्यात आला. राज्याचे माजी राज्यपाला भगतसिंह कोश्यारी, गायिका अलका याज्ञिक यांनाही पद्मविभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला.

### यांनाही मिळाली पद्मश्री

डॉ. पुन्नियामूर्ती नटेसन, डॉ. श्यामसुंदर, गफरूद्दीन मेवारती, हॅली वॉर, इंद्रेजीतसिंग सिद्धू, के. पजनीवेल, कैलाशचंद्र पंत, खेमराज सुंदरियाल, कोलाक्कईल देवकी अम्मा, महेंद्रकुमार मिश्रा, मीर हाजीभाई कासमभाई, मोहन नागर, नरेंद्रचंद्रेव वर्मा, निलेश मांडलेवाला, नुरुद्दीन अहमद, ओथुवार थिरूवानी, पोकिला लेकथेपी, आर. कृष्णनन, ॲड. आर. एस. गोडबोले, रघुपतसिंग, राजस्थपती कललिअप्पा गोंडूर, रामा रेड्डी ममिडी, एस. जी. ऋशील अम्मा, सॅंग्युसंग पोंगनेर, अंके गौडा यांनाही पद्मश्रीने सन्मानित करण्यात आले.

## चंद्रपूरचा 'रिमोट कंट्रोल' मातोश्रीवर
## ठाकरे गटाच्या अटीने
## काँग्रेस-भाजपचीझोप उडाली

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**चंद्रपूर, दि. २५**

चंद्रपूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने निर्माण झालेला सत्तेचा पेच आता थेट मुंबईतील 'मातोश्री' निवासस्थानी पोहोचला आहे. सत्तेच्या चाव्या हाती असलेल्या शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने 'अडीच वर्ष महापौरपद आमचेच हवे' ही आक्रमक अट घातल्याने काँग्रेस आणि भाजप या दोन्ही मोठ्या पक्षांच्या गोटात कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे. आज मुंबईत होणाऱ्या महत्त्वाच्या बैठकीनंतर चंद्रपूरचा 'नवा कारभारी' कोण, याचा फैसला होण्याची शक्यता आहे.

**काँग्रेस मोठा पक्ष, पण सत्ता लांबच**

चंद्रपूरच्या ६६ जागांच्या रणसंग्रामात २७ जागा जिंकून काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. मात्र, बहुमताचा ३४ हा जादूई आकडा गाठण्यासाठी त्यांना अद्याप ७ नगरसेवकांची गरज आहे. दुसरीकडे, २३ जागांवर विजय मिळवलेला भाजप कोणत्याही परिस्थितीत सत्ता हस्तगत करण्यासाठी पडद्यामागून हालचाली करत आहे.




## मालाड स्थानकावर प्राध्यापकाची हत्या

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २३**

धावती मुंबई लोकल, कामावरून घरी परतणारी लाखो प्रवाशांची गर्दी आणि अचानक एका किंकाळीने मालाड रेल्वे स्थानक हादरून गेलं! एका सुशिक्षित शिक्षकाची भर गर्दीत, सर्वांच्या देखत अमानुष हत्या करण्यात आली. कारण काय? तर फक्त 'लोकलमध्ये उभं राहण्याचा किरकोळ वाद'. या घटनेचा जो उउद्गत व्हिडिओ समोर आला आहे, तो पाहून तुमच्याही अंगावर काटा आल्याशिवाय राहणार नाही.

शनिवारी सायंकाळची वेळ, चर्चगेटवरून सुटलेली लोकल मालाडच्या दिशेने धावत होती. डब्यात पाय ठेवायला जागा नव्हती. याच गर्दीत अलोक सिंग नावाचे शिक्षक आणि ओंकार शिंदे हा तरुण समोरासमोर होते. 'जरा पुढे सरका,' या एका वाक्यावरून ठिणगी पडली.

ओंकार सातत्याने अलोक यांना ढकलत होता, ओरडत होता. डब्यात शाब्दिक चकमक सुरू झाली, पण कोणालाही वाटलं नव्हतं की या वादाचा शेवट रक्ताच्या थारोळ्यात होईल. लोकल मालाड स्थानकात थांबली आणि अलोक सिंग खाली उतरले.

मात्र, रागाने पिसाळलेला ओंकार त्यांच्या पाठीवरच होता. त्याने आपल्या जवळचं धारदार शस्त्र काढलं आणि मागून अलोक यांच्यावर सपासप वार केले. भर गर्दीत अलोक रक्ताच्या थारोळ्यात कोसळले. आजूबाजूला लोक होते, पण त्याचं क्रूर रूप पाहून कोणाचीही पुढे यायची हिंमत झाली नाही. रुग्णालयात नेईपर्यंत अलोक यांचा मृत्यू झाला होता.

### सुटीची सूचना

**उद्या सोमवार, दि. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त दै. युवाराष्ट्र दर्शन कार्यालयाला सुटी असल्याने मंगळवारचा अंक प्रकाशित होणार नाही.**

**तरी वाचक, जाहीरातदार आणि वितरक यांनी नोंद घ्यावी.**

## ट्रकच्या धडकेत सायकलस्वार तरुणी जखमी

**नागपूर :** ट्रक चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून सायकलस्वार तरुणीला मागून जबर धडक दिली आणि पसार झाला. यात गंभीर जखमी तरुणीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नेहा नरेश कातरे (२८) रा. वाठोडा असे जखमी तरुणीचे नाव आहे. पोलिसांनी आरोपी ट्रक चालकावर गुन्हा नोंदविला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास नेहा शिकवणी आटोपून सायकलने घरी जात होती. खरबी चौकात लाल दिवा असल्याने ती सिग्नलवर थांबली. त्याच दरम्यान मागून आलेल्या ट्रक क्र. एमएच-१२/टीव्ही-०८३५ च्या चालकाने नेहाच्या सायकलला मागून जबर धडक दिली आणि पळून गेला. यात सायकलसह खाली रस्त्यावर पडून नेहा गंभीर जखमी झाली. घटनेची माहिती मिळताच नंदनवन पोलिस घटनास्थळी पोहोचले. नेहाला उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती करण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी नेहाचे वडील नरेश यांच्या तक्रारीवरून आरोपी ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवत त्याचा शोध सुरू केला आहे.









युवाराष्ट्र दर्शन
# गोंदिया जिल्हा
सोमवार, २६ जानेवारी २०२६

**वार्ताहर व एजेन्सी नियुक्ती करणे आहे**
मराठी लोकप्रिय दै. युवाराष्ट्र दर्शन करिता गोंदिया जिल्ह्यातील आमगाव, सालेकसा, देवरी, सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, तिरोडा, गोंदया क्षेत्रात वर्तमान पेपरच्या एजेन्सी व वार्ताहर करिता संपर्क साधा मो. ९५१८९३४०९६
**युवाराष्ट्र दर्शन, गोंदिया जिल्हा कार्यालय**
जिल्हा प्रतिनिधी मुकेश कुमार मिश्रा, कार्यालय पत्ता मनोहर चौक, गोविंदपूर रोड बग्गा कॉम्प्लेक्सच्या जवळ गोंदिया, ता. जि. गोंदिया बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क करा
मो./व्हॉटअप नं. ९१७५२८३७४०

# विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून आयोजित तंत्रप्रदर्शनीचे कौतुक : आ. विनोद अग्रवाल

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** विद्यार्थ्यांच्या कल्पकतेतून आयोजित तंत्रप्रदर्शनीचे कौतुक आमदार विनोद अग्रवाल यांनी केले. कौशल्य रोजगार व उद्योजकता व नाविन्यता विभाग व्यवसाय क्षिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या वतीने २३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हास्तरीय तंत्रप्रदर्शनीचे आयोजन महर्षि अरविंद शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था गोंदिया येथे करण्यात आले, त्यावेळी श्री. अग्रवाल उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी आर.बी. गणवीर होते.




अग्रवाल म्हणाले, आयटीआयमध्ये शिकणारे विद्यार्थी कल्पक बुध्दीचे असून या तंत्रप्रदर्शनीमुळे त्यांच्या कल्पक बुध्दीला चालना मिळाली. भविष्यात हे विद्यार्थी त्यांनी निवडलेल्या करिअरमध्ये नक्कीच प्रगती करतील अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या.श्री. गणवीर यांनी जिल्हास्तरीय तंत्रप्रदर्शनीचे आयोजनाबद्दल शुभेच्छा दिल्या. उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत म्हणाले, तंत्रशिक्षण हे आयुष्याच्या सर्वच टप्प्यावर हमखास रोजगार उपलब्ध करुन देणारे आहे. या तंत्रप्रदर्शनीमध्ये जिल्हयातील सर्व तालुक्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतुन विविध मॉडेल्स तयार करुन आणले होते.कार्यक्रमास ग्रामपंचायत फुलचुर पेठ सरपंच उषा बावनकर, पोलिस पाटील फुलथुर पेठ मंगला तिडके, नवउषा गारमेंटचे व्यवस्थापक विजयकुमार चोपडा, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था गोरेगाव प्राचार्य व्ही.बी. म्हात्रे, शासकीय आदिवासी औद्योगिक प्रशिक्षण सस्था बिजेपार प्रकल्प अधिकारी बी.के. सरनाईक उपस्थित होते.या प्रदर्शनीचे आयोजन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था गोंदिया प्राचार्य बी.एन. तुमडाम व सर्व कर्मचारी वृंद यांच्यामार्फत करण्यात आले.

# गोंदिया जिल्ह्यात 'बिरसा हेल्थ कार्ड' अभिनव उपक्रमाचा शुभारंभ

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** राज्यात गोंदिया जिल्ह्यात प्रथमच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी 'बिरसा हेल्थ कार्ड' या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन सभागृहात करण्यात आला.

'एक पाऊल निरोगी भविष्यासाठी-आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यासाठी' या संकल्पनेतून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी अंतर्गत हा उपक्रम प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येत आहे. या 'बिरसा हेल्थ कार्ड'द्वारे आश्रमशाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी, आजारांची नोंद व संपूर्ण आरोग्यविषयक माहिती एकत्रित स्वरूपात उपलब्ध राहणार आहे. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत डॉक्टरांना विद्यार्थ्यांचा पूर्व वैद्यकीय इतिहास तत्काळ उपलब्ध होऊन अचूक व जलद उपचार करणे शक्य होणार आहे. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये स्वच्छता, संतुलित आहार, व्यायाम, व्यसनमुक्ती तसेच विविध आजारांबाबत



असलेले गैरसमज दूर करण्यासाठी जनजागृती करण्यात येणार आहे. महाराष्ट्रात प्रथमच आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी एकत्रित हेल्थ कार्ड उपलब्ध करून देण्यात येत असून, हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण आरोग्य विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. आश्रमशाळांमध्ये नर्स उपलब्ध झाल्यामुळे आरोग्यविषयक माहितीचे संकलन व जतन करणे अधिक सुलभ होणार आहे. आश्रमशाळेतील विद्यार्थी निवासी असल्याने व सिकलसेलसारख्या आजारांचे प्रमाण जास्त असल्याने, आजारपणाच्या वेळी वैद्यकीय इतिहास उपलब्ध नसतो. 'बिरसा हेल्थ कार्ड'मुळे आता विद्यार्थ्यांची संपूर्ण आरोग्य माहिती सहज उपलब्ध होणार असून उपचारांमध्ये येणाऱ्या अडचणी दूर होणार आहेत. या उपक्रमाचा अनावरण सोहळा जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन सभागृहात पार पडला.

# सरस्वती विद्यालयात राष्ट्रीय मतदार दिन साजरा

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**अर्जुनी मोरगाव:**स्थानिक सरस्वती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात २५ जानेवारी २०२६ ला राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य जे.डी.पठाण तर प्रमुख उपस्थिती ज्योती कांबळे उपविभागीय अधिकारी अर्जुनी/मोर, अनिरुद्ध कांबळे तहसीलदार अर्जुनी/मोर, सुभाष बागडे गटशिक्षणाधिकारी अर्जुनी/मोर,बेनीराम भानारकर विस्तार अधिकारी अर्जुनी/मोर.,नाजुकराव लंजे विस्ताराधिकारी अर्जुनी/मोर., विलास



काशीवार,उपप्राचार्या अर्चना गुरुनुले,पर्यवेक्षक शिवचरण राघोते, यांची होती.मतदान करताना कुठल्याही अमिशाला बळी न पडता निस्वार्थीपणे मतदानाचा हक्क प्रत्येक नागरिकाने बजावलाच पाहिजे.लोकशाही देशात मतदानाचा मूलभूत अधिकार अठरा वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक नागरिकाला असून त्यांनी तो बजावलाच पाहिजे असे मार्गदर्शन मान्यवरांनी केले. या दिनाचे औचित्य साधून मतदार दिवसाची शपथ विद्यार्थ्यांना व मान्यवरांना देण्यात आली. आरएसपी,स्काऊट/गाईड व रासेयो विद्यार्थ्यांची मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. सदर जनजागृती रॅलीला हिरवी झेडी ज्योती कांबळे उपविभागीय अधिकारी अर्जुनी/मोर. यांनी दाखवली.कार्यक्रमाचे संचालन करुन आभार सुजित जक्कुलवार यांनी मानले.

## विद्युत मोटारपंप लंपास

**गोंदिया :** गोरेगाव तालुक्यातील कुऱ्हाडी येथे शेतकऱ्याने शेतात सिंचनासाठी लावलेली मोटार पंप अज्ञात चोरट्यांनी लंपास करून फिर्यादी शेतकऱ्याचे २० हजार रुपयाचे नुकसान केले आहे. ही घटना २२ ते २३ जानेवारीची आहे.

रब्बी हंगामात शेतकऱ्यांना पाण्याची नितांत गरज असते. यामुळे अनेक शेतकरी शेतात विद्युत मोटार पंपाच्या सहाने पिकांना पाणी देण्याचे काम करीत असतात. गोरेगाव तालुक्यातील कुऱ्हाडी येथे फिर्यादी गिता अनिक कोसमे (४९) रा. पालचौका गोंदिया यांनी आपल्या शेतात सिंचनासाठी २० हजार रुपये किंमतीची मोटारपंप लावली होती. मात्र अज्ञात चोरट्यांनी डाव साधून मोटारपंपा लंपास केली. फिर्यादीच्या तक्रारीवरून गोरेगाव पोलिसात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सफौ. राजकुमार पवार करीत आहेत.

# कोहळी समाज महिला मंडळ कडून हळदी कुंकू कार्यक्रम



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सडक अर्जुनी :** कोहळी समाज महिला मंडळ सडक अर्जुनी च्या सौजन्याने महिलांच्या सन्मानाची व सामाजिक एकोप्याची परंपरा जोपासली जावी यासाठी नगरातील कोहळी समाज महिलांनी एकत्र येवून हळद कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले.

सदर सोहळा सौ. चंद्रकला डोंगरवार जिल्हा परिषद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली सौ . वंदना किशोर डोंगरवार उपनगराध्यक्ष तथा माजी सभापती पंचायत समिती , लता गहाणे, लीला आरसोडे ,वंदना बनसोड, मीरा कापगते, पौर्णिमा डोंगरवार, उषा डोंगरवार ,भाग्यश्री पर्वते, निशा पुसतोडे , सुषमा खुणे ,शारदा बोरकर, मीनाक्षी बोरकर , मालती परशुरामकर यांच्या प्रमुख उपस्थितीत घेण्यात आला . या कार्यक्रमाचे औचित्य साधून विविध खेळ, स्पर्धा, महिला सक्षमीकरण सबंधित उपक्रम राबविण्यात येवून सर्व महिलांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविक मधून वंदना किशोर डोंगरवार यांनी हळद कुंकू ही केवळ पूजासामग्री नसून ती भारतीय नारीशक्ति चे प्रतीक आहे व हळद आरोग्य शुद्धता व समृद्धीचे तर कुंकू सौभाग्य श्रध्दा व आत्मसन्मान चे प्रतीक आहे यामुळे महिला मधील आपुलकी आदरभाव वाढेल असे मत व्यक्त केले,

या प्रसंगी या सणाचे निमित्ताने पोर्णिमा डोंगरवार, लता गहाणे यांनी सुद्धा महिला सबलीकरण बाबतीत मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे अध्यक्षा चंद्रकला डोंगरवार यांनी समाजातील महिलांनी आजच्या धकाधकीच्या जीवनात घर संसार, नोकरी, शेती व्यवसाय अशा अनेक जबाबदाऱ्या पार पाडून आरोग्य, स्वावलंबन बचत गट यांच्या माध्यमातून पुढे जाण्याच्या सल्ला दिला. कार्यक्रमचे संचालन मीनाक्षी गहाणे यानी तर आभार प्रदर्शन भारती मस्के यांनी मानले. या कार्यक्रमा साठी निशा पुसतोडे , नीलिमा हातझाडे , प्रिती कापगते, दुर्गा परशुरामकर, वैशाली डोंगरवार, ममता आरसोडे , रेखा कापगते , सरिता गोबाडे , इंदू कापगते, लता पर्वते , रुपाली डोंगरवार, शिल्पा रुखमोडे , अर्चना डोंगरवार यांनी कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात समाजातील मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

# धान विकून दोन महिने लोटले; चुकारे कधी अदा करणार ?

## शेतकऱ्यांचा सवाल : शेतकऱ्यांची आर्थिक अडचण

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सडक अर्जुनी :** धान विकून दोन महिन्याचा कालावधी लोटूनही शेतकऱ्यांना त्यांचे चुकारे अदा करण्यात न आल्याने शेतकरी वर्ग प्रचंड आर्थिक अडचणीत सापडला असून त्वरित चुकारे अदा करावे अशी मागणी करण्यात आली आहे.

खरीप पणन हंगाम सन २५ २६ मध्ये किमान आधारभूत खरेदी किंमत योजनेअंतर्गत तालुक्यात आदिवासी विविध कार्यकारी सोसायट्या व जिल्हा मार्केटिंग फेडरेशन अंतर्गत करारनामा केलेल्या धान खरेदी संस्था मार्फत शेतकऱ्याकडून धान खरेदी करण्यात आले मात्र आता जवळपास दोन महिन्याचा कालावधी उलटूनही धानाचे चुकारे अदा करण्यात आले नाही परिणामी शेतकऱ्यांना आर्थिक अडचणीचा



सामना करावा लागत आहे.

**पालकमंत्र्यांना निवेदन**

शेतकऱ्यांची होत असलेली आर्थिक अडचण लक्षात घेता सडक अर्जुनी येतील आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या शिष्टमंडळाने जिल्हा नियोजन सभेसाठी आलेल्या पालकमंत्री डॉक्टर इंद्रनील नाईक यांची प्रत्यक्ष भेट घेऊन व निवेदन सादर करून धानाचे चुकारे त्वरित अदा करावे अशी मागणी करण्यात आली त्यावर लवकरच चुकारे अदा करण्यात येतील असे आश्वासन देण्यात आले तर दुसरीकडे भंडारा गोंदिया लोकसभा क्षेत्राचे खासदार डॉक्टर प्रशांत पडोळे यांनीही राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या नावे सडक अर्जुनी तहसीलदारा मार्फत निवेदन सादर करून शासकीय हमीभाव दान खरेदी केंद्रावर विक्री केलेल्या धानाचे चुकारे त्वरित अदा करावे अशी मागणी केली.

**खासदार प्रफुल पटेल यांच्याकडून अपेक्षा**

जिल्ह्यातील आमदार खासदार सहकारी संस्था शेतकरी वर्गाकडून त्वरित चुकारे अदा करण्यात यावे म्हणून शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहे त जिल्ह्याच्या राजकारणात वजनदार व्यक्ती म्हणून खासदार प्रफुल पटेल यांनी शब्द खर्च करावा व त्वरित धानाची चुकारे अदा करावे अशी अपेक्षा शेतकरी वर्गाकडून होत आहे.

# प्रजासत्ताक दिनी नवीन प्रशासकीय तहसील कार्यालय इमारतीचे भूमिपूजन

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**अर्जुनी मोर :** अर्जुनी मोरगाव येथील तहसील कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाचे भूमिपूजन समारंभ सोमवार दिनांक २६ जानेवारी रोजी दुपारी एक वाजता पार पडणार आहे महाराष्ट्र शासनाच्या वतीने होणाऱ्या या इमारत बांधकामाचे भूमिपूजन राज्याचे उद्योग व सार्वजनिक बांधकाम उत्सव व तंत्रशिक्षण आदिवासी विकास व पर्यटन मदत व जलसंधारण तसेच पालकमंत्री गोंदिया इंद्रनील नाईक यांच्या शुभहस्ते होणार आहे या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्यसभा सदस्य प्रफुल्ल पटेल लोकसभा सदस्य डॉक्टर प्रशांत पडोळे आमदार राजकुमार बडोले विधान परिषद सदस्य डॉक्टर परिणय फुके डॉक्टर अभिजीत वंजारी जिल्हा परिषद अध्यक्ष लायक राम भेंडारकर नगराध्यक्ष श्रीमती मंजुषा बारसागडे पंचायत समिती सभापती श्रीमती आम्रपाली डोंगरवार महिला व बालकल्याण सभापती पौर्णिमा डेंगे व इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत पार पडणार आहे या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी गोंदिया श्री रजीत नायर भा प्र से अप्पर जिल्हाधिकारी श्री मिनाज मुल्ला उपविभागीय अधिकारी ज्योती कांबळे तहसीलदार अनिरुद्ध कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या असून नागरिकांनी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मुनेश रहांगडाले यांचे संचालक पद कायम

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**गोंदिया :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा पंचायत समितीचे सभापती मुनेश रहांगडाले यांच्याविरुद्ध दाखल करण्यात आलेली तक्रार पूर्णतः निराधार असल्याची स्पष्ट झाली आहे. या प्रकरणी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, गोंदिया यांनी तक्रार फेटाळून लावत मुनेश रहांगडाले यांचे संचालक पद कायम ठेवण्याचा आदेश दिला आहे.



कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक धनलाल बालचंद ठाकरे यांनी मुनेश रहांगडाले यांच्याविरुद्ध जिल्हा उपनिबंधकांकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीत रहांगडाले हे शेतकरी नसल्याचा तसेच त्यांच्या उत्पन्नाचा योग्य स्रोत नसल्याचा आरोप करत महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती नियम २०१७ मधील नियम १० (३) अंतर्गत त्यांचे संचालक पद रद्द करण्याची मागणी केली होती. या तक्रारीवर सुनावणी करताना जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था गोंदिया अर्चना माळवे यांनी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तिवाद ऐकून घेतला. सर्व कागदपत्रे, पुरावे व कायदेशीर बाबींचा अभ्यास केल्यानंतर त्यांनी स्पष्ट आदेश देत धनलाल ठाकरे यांनी दाखल केलेला तक्रार अर्ज फेटाळून लावला व मुनेश रहांगडाले यांचे संचालक पद कायम ठेवण्याचा निर्णय दिला.

या प्रकरणात मुनेश राहांगडाले यांच्या वतीने वाय. एम. पारधी यांनी प्रभावी व ठोस युक्तिवाद सादर केला. तसेच या प्रकरणात पी. सी. चव्हाण व विश्वनाथ रहांगडाले यांनी वेळोवेळी सहकार्य केले.

# नॅशनल बॉडीबिल्डिंग स्पर्धेसाठी बंधाटे यांची निवड

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तिरोडा :** तालुक्यातील नजिकच्या देव्हाडी क्षेत्रातील नामवंत बॉडीबिल्डर तथा क्रीडा क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे संतोष बंधाटे यांची तेलंगणा येथे ६, ७ व ८ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या ९५ किलो वजनी नॅशनल लेव्हल बॉडीबिल्डिंग स्पर्धेसाठी करीम नगर तेलंगणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीमुळे तुमसर–देव्हाडी परिसरासह आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



१० जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या निवड चाचणीत बन्नाटे यांनी उत्कृष्ट शारीरिक सादरीकरण, आत्मविश्वास व मेहनतीच्या जोरावर यश संपादन केले. त्यांच्या या यशामुळे त्यांनी संपूर्ण जिल्ह्यात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला असून क्रीडा क्षेत्रात जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचविले आहे. लहानपणापासूनच क्रीडाप्रेमी असलेल्या संतोष बंधाटे यांनी बॉडीबिल्डिंग या खेळामध्ये विशेष प्रावीण्य मिळविले आहे. सातत्यपूर्ण सराव, कठोर परिश्रम, संतुलित आहार व शिस्तबद्ध जीवनशैली या बळावर त्यांनी हे यश मिळविले आहे. आज ते अनेक तरुणांसाठी प्रेरणास्थान ठरत असून ग्रामीण भागातील युवकांनाही क्रीडा क्षेत्रात करिअर करण्याची दिशा मिळत आहे. तेलंगणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत संपूर्ण भारतातून नामांकित बॉडीबिल्डर्स सहभागी होणार असून, त्यामध्ये संतोष बंधाटे हे विदर्भाचे प्रतिनिधित्व करणार आहेत. त्यांची निवड ही केवळ वैयक्तिक यश नसून संपूर्ण परिसरासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

# ऋग्वेद येरणेचे सुयश

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तिरोडा :** रेशीम बाग येथील डॉ. हेडगेवार स्मारक समितीच्या महर्षी व्यास सभागृहात युसीएमएएस तंत्रज्ञानाचे प्रभावी प्रात्यक्षिक पाहायला मिळाले ५ ते १३ वयोगटातील मुलांनी अवघ्या काही मिनिटात दोनशे गणितीय प्रश्न सोडवून पालक व प्रेक्षकांना थक्क केले. या स्पर्धेत वर्ग चौथीचा ऋग्वेद डुलिंदर येरणे यांनी प्रथम क्रमांक मिळविला.



मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते हे स्पर्धा युपीएमएएस ची १४वी नागपूर रिजन राज्यस्तरीय स्पर्धा होती.राज्यातील विविध शहरातून १२०० हुन अधिक विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. स्पर्धा लिसनिंग आणि फ्लॅश असे स्थिर प्रकारात घेण्यात आली. अबॅकस तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांनी वेग, अचूकता आणि आत्मविश्वासाचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी आठ स्तर पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवीदान आणि बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धेत वर्ग चौथीचा ऋग्वेद डुलिंदर येरणे यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

## टिप्परच्या धडकेत इसमाचा मृत्यू

**गोंदिया :** नजिकच्या हिवरा मार्गावर टिप्पर चालकाने आपल्या ताब्यातील वाहन लापरवाहीने चालवून इसमास धडक दिली. अपघातात सदर इसम हा मागच्या चाकात आल्याने त्याचा झाला. ही घटना २३ जानेवारीची आहे. साहेबलाल तिलकचंद पिसोने (६२) असे मृताचे नाव आहे. फिर्यादी सरतर्फे परिपोउपनी संकेत कुमार सदलगे यांच्या तक्रारीवरून व वैद्यकीय अहलावावरून आरोपी बलीराम कटंगकार (३६) रा. लोधीटोला यांच्या विरुद्ध रामनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पमोउपनी ज्योती कैलास नेहे करीत आहेत.

# अखेर लघु पाटबंधारे उपविभागात, उपविभागीय अधिकारी रुजू

**दैनिक युवा राष्ट्र दर्शन वृत्तपत्राची घेतली प्रशासनाने दखल**

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**सालेकसा :** गोंदिया जिल्ह्यातील लघु पाटबंधारे जिल्हा परिषद लघु सिंचाई कार्यालय मार्फत मागील तीन महिन्यापासून येथे लघु पाटबंधारे जिल्हा परिषद कार्यालयात उपविभागीय अधिकारी यांचे पद रिक्त होते यामध्ये कामे करताना इतर कनिष्ठ अभियंता वरिष्ठ


सालेकसा येथील लघु पाटबंधारे जि प विभाग कार्यालय वाऱ्यावर

लिपिक यांना फार मोठी तारेवरची कसरत करावी लागत होती व तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांची बदली

**या संदर्भात अधिक माहिती घेतली असता आपण साले कशाला विशेष, अधिक वेळ देऊन लोकांचे कामे केले जातील तसेच दैनिक युवा राष्ट्र दर्शन वृत्तपत्राची दखल घेत प्रशासन देखील दैनिक युवा राष्ट्र दर्शन वृत्तपत्राचे आभार मानत आहे**
**– आदित्य राहुलकर उपविभागीय अभियंता लघु पाटबंधारे सिंचन विभाग कार्यालय सालेकसा**

चंद्रपूरला झाल्याने येथे कायमस्वरूपी उपविभागीय अधिकारी नव्हते मात्र दैनिक युवा राष्ट्र दर्शन वृत्तपत्रात बातमी दिनांक १९ १ २०२६ रोजी प्रकाशित केली होती या बातमीची दखल घेत प्रशासनाने तात्काळ दखल घेत दिनांक २०.१.२०२६, रोजी गोंदिया येथील आदित्य,राहुलकर यांची उपविभागीय अधिकारी म्हणून सालेकसा येथे रुजू झाले आहेत त्यामुळे आता कामे सुलभ गतीने होतील व प्रलंबित कामांना सुद्धा प्रशासकीय मंजुरी व काही कामे झालेले आहेत त्यांचे सुद्धा बिल प्रलंबित असल्यामुळे ते सुद्धा मार्गी लावणार असल्याची ही प्रतिक्रिया आदित्य राहुलकर यांनी दैनिक युवा राष्ट्र दर्शनच्या प्रतिनिधींना दिली आहे त्यामुळे वरिष्ठाकडून दैनिक युवा राष्ट्र दर्शन वृत्तपत्राचे आभार व्यक्त केले जात आहे.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
सोमवार दि.२६ जानेवारी २०२६

## अन्नाच्या शोधात मानवी वस्तीत आलेल्या चितळाचा दुर्दैवी अंत

**लाखांदूर :** आता जंगलातील अन्नाचा शोध घेत मानवी वस्तीत शिरलेल्या एका निष्पाप चितळाचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी (ता. २४) लाखांदूर शहरात घडली.निसर्गाच्या साखळीतील हा सुंदर प्राणी अन्नाच्या शोधात थेट शहरात पोहोचला, मात्र त्याचे नशीब बलवत्तर नव्हते. शनिवारला सकाळी ११ वाजेच्या सुमारास लाखांदूर येथील वॉर्ड क्रमांक १२ मध्ये ही घटना उघडकीस आली.

प्राप्त माहितीनुसार स्थानिक रहिवासी मुक्ताबाई रमेश देसाई यांच्या घरासमोरील अंगणात एक चितळ मृतावस्थेत पडून असल्याचे काही नागरिकांच्या निदर्शनास आले. भर वस्तीत चितळ मृतावस्थेत आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी विलंब न करता लाखांदूरवन विभागाला पाचारण केले. वनविभागाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी मृत चितळाचा पंचनामा करून देह ताब्यात घेतला आणि पुढील प्रक्रियेसाठी वन विभागाच्या कार्यालयात नेले.

या प्रकरणाचा सखोल तपास वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चन्ने यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. चितळाचा मृत्यू नेमका कशामुळे झाला? तो नैसर्गिक आहे की अन्य काही कारणाने, हे शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# तुमसर न.प.सभापती निवडणूक पारदर्शक पद्धतीनेच होणार !

## तीन स्वीकृत सदस्याबाबत अजूनपर्यंत अधिकृत आदेश नाही : नगराध्यक्ष सागर गभणे



**युवाराष्ट्र दर्शन / श.प्रतिनिधी**

**तुमसर :-** तुमसर नगर परिषदेच्या सभापती पदाची निवडणूक दि. २७ जानेवारी २०२६ रोजी नियोजित असून ही निवडणूक नियमबद्ध, शांततामय व पारदर्शक पद्धतीने पार पडणार असल्याची स्पष्ट भूमिका नगराध्यक्ष सागर गभने यांनी मांडली. रविवारी नगर परिषद कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

नगराध्यक्ष गभने यांनी सांगितले की, ही निवडणूक पिठासीन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी उपेश अंबादे यांच्या देखरेखीखाली आणि प्रशासनाच्या नियंत्रणात पार पडणार आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेबाबत नागरिकांनी किंवा सदस्यांनी कोणताही संभ्रम ठेवू नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी त्यांनी स्वीकृत सदस्याबाबतही भूमिका स्पष्ट करत सांगितले की, स्वीकृत सदस्यांची निवड पूर्णतः नियमांनुसारच करण्यात आली आहे. तसेच स्वीकृत सदस्यांची सदस्यता रद्द करण्याबाबत कोणताही अधिकृत आदेश नसल्याचे त्यांनी नमूद केले. सदर प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याची माहितीही त्यांनी दिली. 'न्यायालय जो निर्णय देईल, तो मला आणि सर्व जनतेला मान्य राहील,' असेही नगराध्यक्ष गभने यांनी स्पष्ट केले.

गेल्या काही दिवसांपासून नगर परिषदेच्या कामकाजासंदर्भात विविध चर्चा व बातम्या सुरू असून काही अपूर्ण माहितीमुळे नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी सांगितले. 'सभापती निवडणुकीच्या प्रक्रियेत माझा कोणताही वैयक्तिक इंटरेस्ट नाही. ही निवडणूक पूर्णतः लोकशाही पद्धतीने, सदस्यांच्या मतानुसारच होईल,' असे त्यांनी ठामपणे नमूद केले.

तसेच नागरिकांनी अफवा, अपूर्ण माहिती व गैरसमज पसरवणाऱ्या चर्चांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करत निवडणूक प्रक्रियेत शांतता, नियमपालन आणि पारदर्शकता राखणे हे सर्वांचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, माध्यमांनाही त्यांनी विनंती केली की, वस्तुनिष्ठ आणि अधिकृत माहितीच्या आधारेच बातम्या प्रसिद्ध कराव्यात, जेणेकरून जनतेमध्ये गैरसमज निर्माण होणार नाही.

## साकोलीत ''गांजा बिडी'' पोहचले बसस्थानकाच्या प्लॅटफॉर्मवर



**आशिष चेडगे / युवाराष्ट्र दर्शन**

**साकोली :** अगोदर येथील नशेखोरांनी सार्वजनिक सौंदर्य तलाव चौपाटी बालोद्यानाला दारू सिगारेट गांजाने "टार्गेट" केले. याचे वृत्त "युवाराष्ट्र दर्शन" प्रतिनिधीतर्फे सोशल मिडीयातून व्हॉयरल होताच २१ जानेवारीला नगरपरिषद अधिकारी, नगराध्यक्षा, उपाध्यक्षा व नगरसेविकांनी यांची तातडीने दखल घेतली. आता याच नशेखोरांकडून साकोली बसस्थानकाला आपला "गांजा बिडी" ओढण्याचा अड्डा बनविला आहे. याचे जिवंत छायाचित्रे "युवाराष्ट्र दर्शन" प्रतिनिधीने काल ( रवि. २५ जाने.) ला पहाटे ०५:४५ ला बसस्थानक वरील प्लॅटफॉर्म नंबर ५ मधील आसनाखाली त्यांचे अवशेष आढळले. आता चक्क बसस्थानक आतमध्ये आणि ते सुद्धा प्रवासी बैठक स्थानावर खुलेआम धुम्रपानाचे छायाचित्रे समोर आल्याने राज्य परिवहन महामंडळ खडबडून जागे झाले आहे.

शहरात नागझिरा रोड चौकात "आय लव्ह साकोली" बालोद्यान, तलाव चौपाटी सौंदर्य स्थळ, जिल्हा परिषद हायस्कूल परीसरात दररोज गांजा, एम डी, दारूच्या बाटल्या, सिगरेटचा धुर निघतो. यावर सतत "साकोली सोशल मिडीया" ही बाब समोर आणत आहे. अश्याच खुलेआम धुम्रपान घटनेत सोशल मिडीयाची दखल घेत तलाव चौपाटीवर २१ जानेवारीला प्रशासकीय अधिकारी कल्याणी भंवरे, नगराध्यक्षा देवश्री कापगते, उपाध्यक्षा रोहिणी मुंगूलमारे, नगरसेविका रेणू गणविर, मिना लांजेवार, मेघा बडवाईक हे अधिका-यांसह दाखल झाले होते. आता काल रविवार २५ जानेवारी पहाटे ०५:४५ ला साकोली बसस्थानक प्लॅटफॉर्म नंबर ५ मधील प्रवासी आसनाखाली सिगरेटची पॉकीटे, बाजूला बिड्या, माचिस आणि काही गांजांची अंश आढळून आले. याचे जिवंत छायाचित्रे "युवाराष्ट्र दर्शन" प्रतिनिधीने घेतले आहेत. या संतापजनक घटनेमध्ये चक्क बसस्थानक आतमध्ये ते सुद्धा प्रवासी आसनाखाली सिगरेटची पॉकीटे सापडली. एकीकडे सार्वजनिक शासकीय जागेवर धुम्रपानास बंदी असता आणि गंभीर गुन्हा ठरतांना तेथील लागलेल्या सीसीटीव्ही कॅमेरे आधारे दररोज रात्री बेरात्री या बसस्थानक आतमध्ये बसतो कोण कोण.? याचे सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासून प्रशासकीय महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ साकोली आगार बसस्थानक येथे धुम्रपान व्यसनाधिनता करण्याच्या गुन्ह्यात आरोपींचा शोध घेऊन कडक कारवाई करण्याची मागणी पहाटे जाणा-या प्रवासी जनतेने केली आहे.

## पदाचा दुरूपयोग ; सरपंचासह ७ ग्रा.पं.सदस्य पदावरून पायउतार

### विभागीय आयुक्तांनी केले पदावरून पदमुक्त

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर :** भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यातील सुकळी नकुल ग्रामपंचायतीमध्ये सत्तेचा गैरवापर आणि प्रशासकीय अनियमितता करणाऱ्या लोकप्रतिनिधींना नागपूर विभागीय आयुक्तांनी जोरदार झटका दिला आहे. सरपंच यांच्यासह ग्रामपंचायतीच्या एकूण सातही सदस्यांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९ (१) अंतर्गत दोषी ठरवत त्यांना पदावरून तात्काळ प्रभावाने निष्कासित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. एकाच वेळी संपूर्ण ग्रामपंचायत सदस्यांवर झालेली ही मोठी कारवाई जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, अर्जदार गणेश शंकर आंबेडारे यांनी या सदस्यांविरोधात तक्रार दाखल केली होती. तक्रारीनुसार, गावातील सांडपाण्याच्या नैसर्गिक मार्गावर बेकायदेशीर बांधकाम करणे, घरांच्या नोंदीमध्ये फेरफार करताना नियमांचे उल्लंघन करणे आणि अधिकाराचा दुरुपयोग करून भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याचे आरोप करण्यात आले होते. विशेषतः सांडपाण्याची वाहिनी बंद केल्यामुळे अर्जदाराच्या घरात पावसाचे पाणी शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते, तसेच आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला होता.

या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान धक्कादायक बाबी समोर आल्या. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद भंडारा यांनी सादर केलेल्या फेरचौकशी अहवालात (दिनांक १६.०७.२०२५) स्पष्ट नमूद करण्यात आले की, सरपंच आणि सदस्यांनी आपल्या कर्तव्यात गंभीर कसूर केली आहे. मालमत्ता पत्रक नमुना ८ मध्ये बेकायदेशीररीत्या फेरफार करणे आणि मासिक सभेचे नियम धाब्यावर बसवून ठराव मंजूर करणे, हे आरोप सिद्ध झाले आहेत.

अपर आयुक्त डॉ. माधवी खोडे-चवरे यांनी या प्रकरणाची सविस्तर सुनावणी घेतली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि पुराव्यांचे अवलोकन केल्यानंतर त्यांनी स्पष्ट केले की, सरपंच आणि सदस्यांनी कायद्याचे उल्लंघन केले असून ते पदावर राहण्यास पात्र नाहीत. या निकालात स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे की, केवळ सरपंचच नव्हे तर त्यांना साथ देणारे इतर सहा सदस्य देखील या गैरप्रकारात तितकेच दोषी आहेत.

या आदेशामुळे सुकळी नकुल येथिल सरपंचसह गिता प्रमिलाबाई नागपुरे, सोहनलाल पारधी, सुनिल शिवणे, अमरदिप गोंडाणे, स्वातीबाई पटेल आणि अंतकलाबाई रहांगडाले या सर्वांचे सदस्यत्व रद्द झाले आहे. तसेच, त्यांना भविष्यात या ग्रामपंचायतीचे सरपंच किंवा सदस्य पद धारण करण्यास अपात्र घोषित करण्यात आले आहे. या धाडसी निर्णयामुळे भ्रष्ट कारभार करणाऱ्या स्थानिक लोकप्रतिनिधींचे धाबे दणाणले असून, "कायदा सर्वांसाठी समान आहे" हा संदेश या निमित्ताने पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

# घरकुल लाभार्थ्यांना दिलासा

- तुमसर तालुक्यात ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू उपलब्ध
- ११ रेतीघाटांना मंजुरी; E-TP पासशिवाय वाळू उचलता येणार नाही



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर :** घरकुल बांधकाम करणाऱ्या लाभार्थ्यांसाठी अत्यंत दिलासादायक बातमी आहे. राज्य शासनाच्या ३० एप्रिल २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार, प्रधानमंत्री आवास योजना तसेच इतर शासकीय घरकुल योजनांतील लाभार्थ्यांना ५ ब्रासपर्यंत मोफत वाळू उपलब्ध करून देण्याचा निर्णय अंमलात आणण्यात आला आहे. त्यानुसार तुमसर तालुक्यातील ११ अधिकृत रेतिघाटांवरून घरकुल लाभार्थ्यांना वाळू देण्यात येणार आहे. तुमसर तालुक्यात जवळपास ४८०० लाभार्थी ची यादी पंचायत समिती, तुमसर कडून प्राप्त आहे.

**कोण पात्र आहेत?**

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण / शहरी) लाभार्थी,शासन मान्य इतर घरकुल योजनांतील लाभार्थी, ज्यांचे घरकुल बांधकाम प्रत्यक्ष सुरू आहे किंवा मंजूर आहे.

**मोफत वाळू कुठून मिळेल?**

घरकुल लाभार्थ्यांना पुढील ११ अधिकृत रेतिघाटांवरूनच वाळू मिळणार आहे; सुकळी दे-२, माडगी, ढोरवाडा, उमरवाडा-२, वारपिंडकेपार-२, लोभी-४, लोभी-५, आष्टी, मांडवी, डोंगरी बु-३ व पांजरा दे-२.

**e-TP (Royalty Pass) पास अनिवार्य**

घरकुल लाभार्थ्यांना वाळू उचलण्यासाठी ग्राम महसूल अधिकाऱ्यांमार्फत e-TP (Royalty Pass) निर्गमित केला जाणार आहे. ही प्रक्रिया २३ जानेवारी २०२६ पासून सुरू होणार आहे. e-TP पासशिवाय वाळू वाहतूक केल्यास ती बेकायदेशीर ठरणार आहे.

**लाभार्थ्यांनी काय करावे?**

महाखनिज पोर्टल वर आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक नोंदवावा, स्वतः ट्रॅक्टर व मजुरांची व्यवस्था करावी, नेमून दिलेल्या रेतिघाटावरूनच वाळू उचलावी.

**महत्त्वाचा इशारा**

घरकुल लाभार्थ्यांनी, अनाधिकृत व्यक्ति कडून वाळू खरेदी करू नये, परवानगीशिवाय इतर ठिकाणची वाळू वापरू नये. अनुज्ञेय वाळू व्यतिरिक्त इतरत्रून वाळू घेतल्यास संबंधित लाभार्थ्यावर महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ व भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार दंडात्मक व फौजदारी कारवाई होऊ शकते, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे.

**घरकुल लाभार्थ्यांसाठी सुवर्णसंधी**

मोफत वाळूमुळे बांधकाम खर्चात बचत होईल. वेळेत घरकुल पूर्ण करण्यास मदत होईल. घरकुल लाभार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन तुमसर तहसीलचे तहसीलदार तथा प्रभारी उपविभागीय अधिकारी उपेश अंबादे यांनी केले आहे.

## मयूर लेदे यांची प्रजासत्ताक दिन परेड, नवी दिल्ली करिता निवड

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**अड्याळ :** भंडारा जिल्हातील अड्याळ येथील मयूर कृष्णा लेदे यांना २६ जानेवारी २०२६ प्रजासत्ताक दिन परेड सोहळा, नवी दिल्ली करिता आमंत्रित करण्यात आले आहे. भारत सरकारच्या रक्षा मंत्रालय व MyGov यांचेतर्फे प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून 'स्वतंत्रता का मंत्र : वंदे मातरम्' या विषयावर एक प्रतियोगिता आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये देशभरातून १०,०४४ लोकांनी सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये देशभरातील अंतिम ७८ स्पर्धकांची उत्कृष्ट कामगिरीकरिता निवड करण्यात आली व त्यांना २६ जानेवारी २०२६ प्रजासत्ताक दिन परेड, नवी दिल्ली करिता निवड करण्यात आली आहे. यात महाराष्ट्रातून ११ लोकांची निवड झाली आहे व यामध्ये अड्याळ येथील मयूर कृष्णा लेदे यांचा समावेश आहे.

## विष प्राशन केल्याने एकाचा मृत्यू

**भंडारा :** तालुक्यातील दवडीपार (बेला) येथील विकास चन्नेश्वर टांगले याला दारूचे व्यसन होते. तो ट्रक चालक होता. मात्र दारूच्या व्यसनापाई बऱ्याच दिवसापासून तो कामावर जात नव्हता. दि. २२ जानेवारी रोजी रात्री ९ वाजता दरम्यान त्याने विष प्राशन केले. प्रकृती बिघडल्याने त्याला त्याच्या कुटुंबियांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले. दि. २३ जानेवारी रोजी प्रकृती अधिकच खालावत गेल्याने त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयातील अति दक्षता विभागात हलविण्यात आले. तेथे त्याचेवर उपचार सुरू असताना विकास टांगले याचा मृत्यू झाला.

## वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण

**भंडारा :** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ वा प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवार २६ जानेवारी २०२६ रोजी पोलीस मुख्यालय पोलीस कवायत मैदान येथे सकाळी ९.१५ वा. राष्ट्रध्वज वंदन व संचलनाचा मुख्य शासकीय समारंभ होणार आहे.

राज्याचे वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या हस्ते ध्वजारोहण होणार आहे. सर्व निमंत्रितांनी राष्ट्रीय पोषाखात समारंभ सुरु होण्यापूर्वी २० मिनिटे अगोदर आसनस्थ व्हावे. सुरक्षिततेच्या दृष्टीने सोबत कोणतेही बॅग किंवा तत्सम वस्तू आणू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. या मुख्य शासकीय कार्यक्रमास सर्वांना उपस्थित राहता यावे यासाठी इतर सर्व कार्यालय, संस्था,आदींनी त्यांचे ध्वजवंदनाचे समारंभ सकाळी ८.३० वाजेपूर्वी किंवा १० वाजेनंतर आयोजित करावेत, असेही आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम, समारंभ आदी ठिकाणी राष्ट्रध्वज लावण्याच्या योग्य पद्धतीबाबत शासन परिपत्रक तसेच ध्वजसंहितेतील सूचनेचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. गृह विभागाच्या राष्ट्रध्वजाच्या उचित सन्मानाबाबतच्या परिपत्रकात नमूद केलेल्या निर्देशनानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही याची दक्षता संबंधितांनी घ्यावी, असेही आवाहनही जिल्हा प्रशासनाने आहे.

ग्राम पंचायत कार्यालय दाभा,
त.जि.भंडारा तर्फे सर्व जनतेला
प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!
शुभेच्छुक
सरपंच, उपसरपंच,
ग्राम पंचायत अधिकारी
तसेच ग्राम पंचायत
कर्मचारी वर्ग
ग्रा.पं.दाभा.

## भंडारा येथे 'यादो की परछाईयॉ' ने डॉ.अनिल नितनवरे व्याख्यानमाला संपन्न



**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा:** डॉ. अनिल नितनवरे स्मृती व्याख्यानमालेचा शेवट 'यादो की परछाईयॉ' या कार्यक्रमांतर्गत गीतकार जॉ निसार अख्तर यांच्या जीवनदर्शनाने करण्यात आला.

'यादो की परछाईयॉ' या कार्यक्रमाचे उद्घाटन सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्ष धनंजय दलाल यांनी केले.अध्यक्षस्थानी ज्येष्ठ समाजसेवी अमृत बन्सोड हे होते. गीतकार जॉ निसार अख्तर यांचा जीवनपट चित्रकार व साहित्यिक प्रमोदकुमार अणेराव,गझलकार इंजि. विवेक कापगते, आकाशवाणीच्या उद्घोषिका विणा डोंगरवार यांनी विविध घटना प्रसंग सांगून उलगडून दाखविला.गायक डॉ. राहुल भोरे, डॉ. श्वेता वेगड,डॉ. सिद्धार्थ रंगारी, वृक्षवल्ली तागडे यांनी जॉ निसार अख्तर यांची चित्रपट गीते सादर केली. यात 'आखोही आखोमे इशारा हो गया','चोरी चोरी कोई आये चुपके चुपके','ये दिल और उनकी निगाहों के साये' 'कभी तुम दगा ना दोग',गरीब जान के हमे दगा ना देना' यासह अन्य बहारदार गीतांचे सादरीकरण केले. गीत,नज्म,शायरी यांच्या सादरीकरणाने या संगीतमय कार्यक्रमाला रंगत आली. उद्घाटनपर भाषणातून धनंजय दलाल यांनी व्याख्यानमालेच्या आयोजनासाठी घेण्यात आलेला परिश्रमाचे कौतुक केले.अध्यक्षीय भाषणातून अमृत बन्सोड जॉ निसार अख्तर यांच्या आधीच्या पिढीने भारतीय स्वातंत्र्या लढ्यात घेतलेल्या सहभागाचा इतिहास सांगून कम्युनिष्ठ विचारसरणीच्या जॉ निसार अख्तर त्यांनी आपला वारसा आपला मुलगा जावेद अख्तर यांना दिल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन डॉ.जयश्री सातोकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.नरेश आंबिलकर यांनी केले. कार्यक्रमाला भगवान सुखदेवे, विठ्ठल सार्वे,डॉ. दशरथ कापगते, देवानंद घरत, सौ.अणेराव, नंदू झंझाड, डॉ.गुरुप्रसाद पाखमोडे,घनश्याम कानतोडे,युवराज साठवणे,सुधीर खोब्रागडे,मोहन मिरासे या सह अनेक गणमान्य उपस्थित होते.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, भंडारा
रस्ता सुरक्षा अभियान
॥ सडक सुरक्षा - जीवन रक्षा ॥ दिनांक : 01/01/2026 ते 31/09/2026
'जीवनदूत' अर्थात गुड सेमेरिटन
विशेष सूचना : अपघातग्रस्तांना त्वरीत मदत करा. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार तसेच मोटार वाहन कायदा कलम 134 ए अन्वये अपघातग्रस्तांना मदत केल्यास कोणत्याही नागरी अथवा फौजदारी कारवाईस सामोरे जावे लागत नाही. रस्त्यावरील अपघातग्रस्त लोकांना मदत करण्यास संकोच किंवा कोणतीही भिती बाळगू नका.
▪ कोणत्याही प्रकारचे उत्तरादायित्व स्विकारण्याची गरज नाही. No Civil / Criminal Liability ▪ पोलीसांकडून कोणत्याही प्रकारचा मानसिक त्रास अथवा चौकशी नाही. Protection From Police Harassment ▪ स्वतःची ओळखपत्र अथवा पुराव्याची आवश्यकता नाही. No Compulsion to Disclose Identity ▪ हॉस्पिटलमध्ये अपघातग्रस्तास व्यक्तीसोबत थांबण्याची सक्ती नाही. No Detention at Hospitals ▪ कोणत्याही प्रकारचे बील अथवा पैसे भरण्याची आवश्यकता नाही. No Liability to pay any medical bills

कोर्ट विद्यमान तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी,साकोली यांचे कार्यालय
मौजा-किन्ही प.ह.नं.                दिनांक -२३/०१/२०२६
- जाहिरनामा-
राजकुमार तुळशिराम मानकर रा.किन्ही ता.साकोली जि.भंडारा.
--विरुध्द---
ग्राम पंचायत अधिकारी (जन्म-मृत्यू नोंदणी) ग्रा.पं.कार्यालय किन्ही/एकोडी
ज्याअर्थी अर्जदार राजकुमार तुळशिराम मानकर रा. किन्ही ता. साकोली जि. भंडारा येथील रहिवासी असून अर्जदार यांनी त्यांची आई नामे जसवंता तुळशिराम मानकर ह्यांचे मृत्यु मौजा- किन्ही ता. साकोली जि. भंडारा येथे दिनांक १९/०९/२००९ ला झालेला असल्याने त्यांनी ग्रा.पं. कार्यालय, किन्ही/एकोडी येथे मृत्युची नोंद घेण्यासाठी जन्म व मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अंतर्गत कायदेशीर मृत्युची नोंद घेऊन प्रमाणपत्र मिळण्याकरिता या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे आणि ज्याअर्थी उक्त मृत्युची नोंद घेऊन प्रमाणपत्र देण्याचे योजिले आहे.
त्याकरिता दिनांक २५/०२/२०२६ ही पेशी तारीख सुनावणीसाठी निश्चीत करण्यात आली असून सुनावणी तहसिल कार्यालय, साकोली येथे सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार आहे. त्याअर्थी याव्दारे जाहीर करण्यात येते की, ज्या कोणाचे नामे जसवंता तुळशिराम मानकर ह्यांचे मृत्युची नोंद मौजा - किन्ही येथील ग्रा.पं. किन्ही/ एकोडी ता. साकोली जि. भंडारा येथे मृत्युची नोंद करण्यासंबंधाने कुणास हरकत / आक्षेप सादर करावयाचे असेल तर त्यांनी स्वतः जातीने किंवा अभिकर्ता यांचे मार्फत जाहीरनामा प्रकाशित होण्याचे तारखेपासुन ०१ महिण्याचे आत सदर न्यायालयात हजर राहून उजर तक्रार / आक्षेप अर्ज सादर करावे. विहीत मुदतीत उजर तक्रार / आक्षेप न कळविल्यास संबंधित वरील नामे - जसवंता तुळशिराम मानकर ह्यांचे मृत्युची नोंद घेऊन तसे प्रमाणपत्र देण्यासाठी संबंधितांना आदेशित करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
आज दि. १२/०१/२०२६ रोजी माझ्या सहिने व शिक्क्यानिशी दिले.
स्थळ:- साकोली                स्वा/-
दिनांक :१२/०१/२०२६    शिक्का    तहसिलदार तथा
तालुका दंडाधिकारी, साकोली

युवाराष्ट्र दर्शन
७
वर्धा
जिल्हा
सोमवार, २६ जानेवारी २०२६

# पक्षकाराची फसवणूक करणाऱ्या वकीलावर पक्षकारानेच केला तीन कोटीचा दावा



ॲड. रमेश धारस्कर



रामदास अजमिरे

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी दि. २५**

स्थानिक अधिवक्ता रमेश धारस्कर यांनी रामदास अजमिरे यांची फसवणूक केली म्हणून रामदास अजमिरे यांनी रमेश धारस्कर या अधिवक्तयाची वकिली रद्द करावी म्हणून बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲंड गोवा यांच्याकडे तक्रार केली होती. यामुळे त्यांचा वकिलीचा परवाना रद्द करण्यात आला. त्याविरुद्ध ॲड. रमेश धारस्कर यांनी सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केली होती. त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने रमेश धारस्कर याने रामदास अजमिरे यांची फसवणूक केली, याबाबतचा निकाल कायम ठेवला या आदेशाबद्दल वृत्तपत्राने मोठया प्रमाणात प्रसिद्धी दिली होती हे विशेष! रमेश धारस्कर या वकिलाने रामदास अजमिरे यांची फसवणूक केली, ही बाब सर्वोच्च न्यायालयापर्यंत निश्चित झाल्याने रामदास अजमिरे यांनी रमेश धारस्कर या वकिलाविरुध्द आर्वी न्यायालयात तीन कोटी ब्यान्शी लाख रुपयाचा मानहानीचा दावा दाखल केला आहे.

सविस्तर वृत्त असे आहे की, रामदास अजमिरे यांनी भार्गव यांच्याकडून आर्वी बसस्टॉप जवळील मालमत्ता विकत घेतली होती. त्या विक्री करिता रामदास अजमिरे यांनी वकील रमेश धारस्कर याची नियुक्ती केली होती. रमेश धारस्कार या वकिलाने एका बाजूने रामदास अजमिरे याला घराची विक्री करून दिली तर दुसऱ्या बाजूने भार्गव यांचे भावाकडून दावा दाखल केला व लगेच रामदास अजमिरे यांना माहित न होऊ देता तो दावा आपसी केला. त्यानंतर रामदास अजमिरे यांना रमेश धारस्कर याने बँक ऑफ हैदराबाद या बँकेचा खोटा सर्च रिपोर्ट देऊन रामदास अजमिरे हें त्या पूर्ण घराचे मालकच नाही, असे कळविले. ही बाब रामदास अजमिरे यांना माहीत होताच त्यांनी त्याबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली व भार्गव यांचे विरोधात दिवाणी दावा दाखल केला. पक्षकार रामदास अजमिरे यांची रमेश धारस्कर या वकिलाने फसवणूक केली, म्हणून त्यांचा वकिलीचा परवाना रद्द करण्यासाठी बार कौन्सिलला तक्रार केली असता त्या तक्रारीमध्ये बार कॉन्सिलने व त्यानंतर अपीलमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने रामदास अजमिरे यांची फसवणूक झाल्याचे मान्य करून ॲड. रमेश धारस्कर यांचा वकिलीचा परवाना रद्द केला होता. आता रामदास अजमिरे यांनी आर्वी न्यायालयात रमेश धारस्कर या वकिलाविरुध्द तीन करोड ब्यानंशी लाख रुपयांच्या नुकसान भरपाईचा ५/२०२६ या क्रमांकाचा विशेष दिवाणी दावा दाखल केलेला आहे, ही बाब आर्वी शहरामध्ये चर्चेचा विषय ठरु लागली हे येथे उल्लेखनीय!

# डीपीसी सभेत खासदार काळे यांची आक्रमक भूमिका निधी देण्याचे पालकमंत्र्यांनी दिले आश्वासन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. २५**

अमरावती जिल्हा नियोजन समितीची सभा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेला खासदार अमर काळे उपस्थित होते. यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेत खासदार अमर काळे यांनी सुमारे ३१ कोटी रुपयांची विविध विकासकामे प्रस्तावित केली होती. मात्र प्रस्तावित एकाही कामाला मंजुरी देण्यात आली नसल्याने त्यांनी सभेत तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला जाब विचारला. या संदर्भात जिल्हाधिकारी अमरावती यांना चार ते पाच पत्रांद्वारे माहिती मागवूनही कोणतेही उत्तर मिळाले नसल्याचा आरोप खासदार काळे यांनी केला. 'मी लोकप्रतिनिधी नाही का? मला कामे प्रस्तावित करण्याचा अधिकार नाही का?



मतदारसंघातील जनतेला आम्ही काय उत्तर द्यायचे?' असे प्रश्न उपस्थित करत त्यांनी निधी नाकारण्यामागील कारण स्पष्ट करण्याची मागणी केली. त्यांच्या आक्रमक भूमिकेनंतर पालकमंत्री बावनकुळे यांनी प्रस्तावित कामांना निधी देण्याचे आश्वासन दिल्याने हा विषय निवळला

## वन्यप्राण्यांच्या नुकसानीवर भरपाईसाठी तत्काळ प्रस्ताव सादर करण्याचे आदेश

सभेदरम्यान खासदार काळे यांनी वन्यप्राण्यांमुळे शेतीचे होत असलेल्या नुकसानीचा मुद्दाही उपस्थित केला. गेल्या दोन वर्षांत केवळ चार शेतकऱ्यांनाच नुकसानभरपाई देण्यात आल्याचे निदर्शनास आणून देत अधिकाऱ्यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अधिकारी प्रत्यक्ष शेतात जाऊन पंचनामे करत नसल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असल्याचे त्यांनी सांगितले. यावर पालकमंत्र्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने माहिती गोळा करून प्रस्ताव वन विभागाकडे सादर करण्याचे तसेच मंजुरी देऊन नुकसानभरपाई अदा करण्याचे आदेश दिले.

## अतिवृष्टीत खचलेल्या विहिरींच्या पंचनाम्यांसाठी महसूल विभागाला निर्देश

तसेच अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीसाठी शासनाने मदतीचा आदेश जारी केला असतानाही पंचनामे करण्यात आले नसल्याचा मुद्दा खासदारांनी सभागृहात मांडला. शेतकरी अर्ज करत असूनही गटविकास अधिकारी, तहसीलदार व कृषी विभागाकडून पंचनामे न झाल्याने मदत वितरित होत नसल्याचे त्यांनी सांगितले. यावर पालकमंत्र्यांनी महसूल विभागाला जबाबदारी देत तात्काळ पंचनामे करून मदत वितरित करण्याचे निर्देश दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभेत शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर ठामपणे आवाज उठवत खासदार अमर काळे यांनी आपल्या मतदारसंघातील विविध प्रलंबित मुद्द्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. त्यांच्या या भूमिकेची जिल्ह्यात चर्चा होत आहे.

# पेठे मित्र परिवाराच्यावतीने रक्तदान शिबिर आज

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. २५**

प्रवीण पेठे मित्र परिवाराच्यावतीने प्रजासत्ताक दिनानिमित्त व स्मृतीशेष प्रवीण बनसोड यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिराचे आयोजन उद्या २६ जानेवारी रोजी सकाळी १० ते ३ या वेळेत छत्रपती शिवाजी महाराज चौक, सावंगी मेघे, वर्धा येथे करण्यात आलेले आहे.

रक्तदान शिबिराचे उदघाटन सकाळी १० वाजता खासदार अमर काळे यांच्या हस्ते होईल. ह्या प्रसंगी आमदार अभिजीत वंजारी, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, माजी नगराध्यक्ष शेखर शेंडे, यशवंत ग्रामीण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर देशमुख, किसान अधिकार अभियानचे मुख्य प्रेरक अविनाश काकडे, जिल्हा कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष मनोज चांदुरकर, प्रदेश सरचिटणीस कॉंग्रेस अभ्युदय मेघे, जिल्हाध्यक्ष वंचित बहुजन आघाडी किशोर खैरकार, जिल्हाध्यक्ष आरपीआय आठवले महेंद्र मुनेश्वर, जिल्हाध्यक्ष बहुजन समाज पार्टी अनुमदर्शी भैसारे, शिवसेना उबाठाचे नेते प्रमोद भोमले, जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी श्रीकांत दौड, वर्धा मर्चंट बँकचे अध्यक्ष भिमा शंभरकर तसेच कार्यकर्ते, नागरिक उपस्थित राहणार आहे.

# दुचाकीला श्वान आडवा आल्याने अपघात, एक जखमी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**तळेगाव (शा. पंत.), दि. २५**

नागपूर–अमरावती राष्ट्रीय महामार्गावर तळेगाव शा. पंत येथील एका ढाब्यासमोर दुचाकीला अचानक श्वान आडवा आल्याने झालेल्या अपघातात एक दुचाकीस्वार गंभीर जखमी झाल्याची घटना आज दुपारी घडली.

सावळी कारंजा येथील रहिवासी सुरेश डोंगरे (वय ६०) हे आपल्या दुचाकीवरून कारंजा घाडगे येथून अमरावतीच्या दिशेने जात होते. तळेगाव शा. पंत येथील महामार्ग क्रमांक ६ वरील अख्तरखा पठाण यांच्या ढाब्यासमोर अचानक एक श्वान रस्त्यावर आडवा आल्याने दुचाकीचा तोल जाऊन ते रस्त्यावर जोरात कोसळले. या अपघातात त्यांच्या डोक्याला व शरीराला गंभीर दुखापत झाली असून ते बेशुद्ध अवस्थेत पडून होते. अपघात घडताच ढाबा मालकांनी समयसूचकता दाखवत तात्काळ तळेगाव ग्रामपंचायतीच्या रुग्णवाहिकेशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. रुग्णवाहिका काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाली व जखमी सुरेश डोंगरे यांना तातडीने तळेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. पुढील उपचारासाठी त्यांना कारंजा येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. अपघाताची माहिती तळेगाव पोलीस ठाण्याला देण्यात आली असून पोलिसांनी रुग्णालयात भेट देऊन जखमीची चौकशी केली आहे. सदर घटनेचा पुढील तपास जमादार चंदन ठाकूर व अंकुश कुरवाळे हे करीत आहेत. दरम्यान, राष्ट्रीय महामार्गावर मोकाट श्वानांचा वावर वाढल्याने अपघातांचे प्रमाण वाढत असून संबंधित प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## भरधाव दुचाकीच्या धडकेत महिला जखमी

**वर्धा :** रस्ता ओलांडताना भरधाव दुचाकीने धडक दिल्याने रुपाली कापसे रा. नालवाडी ही गंभीर जखमी झाली. हा अपघात गणेशनगर बोरगाव (मेघे) येथे झाला.

चंद्रशेखर कापसे (३७) हे पत्नी रुपाली, मुलगा वेदांत यांच्यासह डी-मार्ट येथे जात असताना गणेश नगर येथे पाणी पुरी खाण्यासाठी थांबले, पाणीपुरी सेवनानंतर तिघेही रस्ता ओलांडत असताना एम. एच. ३२, ए. टी. ७९३४ क्रमांकाच्या दुचाकीने रुपाली कापसे यांना धडक दिली, यात त्या जखमी झाल्या, याप्रकरणी तक्रारीवरुन शहर पोलिसांनी २१ जानेवारी रोजी गुन्हा दाखल केला आहे, त्या परिसरात रस्ता ओलांडताना नेहमीच अपघात होतात, त्याकडे वाहतूक नियंत्रण शाखेचे दुर्लक्ष आहे.

# बनावट क्रमांकाच्या एकाच मालकाच्या नावे असलेल्या दोन ट्रकने रेतीची अवैध वाहतूक

## ▶▶ सेलू पोलिसांची कारवाई, ▶▶ ७५ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. २५**

एकाच नोंदणी क्रमांकाच्या नंबर प्लेटचे दोन ट्रक वापरुन अवैधरित्या चंद्रपूर जिल्हयातुन चंद्रपूर ते सेलू मार्गावरुन वर्धा जिल्ह्यात पांढ-या रेतीची अवैध तस्करी करुन शासनाचा लाखो रुपयाचा महसूल बुडवित फसवणूक केल्याप्रकरणी आरोपी ट्रक मालक इरशादखॉं पठाण वय (५०) रा. खडकी ता. सेलू, ट्रक चालक अमित लिलाधर मस्के रा. महाबळा यांचेवर सेलू पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करीत ७५ लाख २१ हजार २५० रुपयांचा माल जप्त करण्यात आला. ठाणेदार देवेंद्र ठाकुर यांना मुखबीरकडून माहिती मिळाली के के.जी.एन. ट्रान्सपोर्ट सेल समोर व रेहकी रोडवरील इंडियन ऑईल पेट्रोल पंपासमोर एकाच नंबरचे एमएच ३२एएस २७८६ किंमत ३५ लाख दोन ट्रक उभे असलेले दिसून आले. त्यापैकी के.जी.एन. ट्रान्सपोर्ट सेलू चे मालक इरशादखान सिकंदरखान पठाण रा. सेलू यांच्या मालकीचे असल्याचे दिसून आले. त्यावरुन ट्रक मालकास विचारपूस करण्यात आली तसेच आरटीओ वर्धा व तहसीलदार सेलू यांचेकडून दोन्ही ट्रकची तपासणी करुन



अहवाल प्राप्त करण्यात आला. यातील ट्रक मालक व चालक यांनी संगनमत करुन १६ चक्का ट्रक क्र.एम.एच. ३२ए.के. १७८६ ची बनावट नंबर प्लेट तयार करुन व खरी असल्याचे भासवून चंद्रपूर जिल्ह्यातील वैनगंगा नदीवरील रंगमोचन रेती घाटावरुन अंदाजे ४५६.६८घन फूट (४.५०ब्रास) पांढरी रेती किं. २० हजार २५० विना रॉयल्टीने अवैधरित्या प्राप्त करीत रेतीची तस्करी करण्याकरिता ट्रक मालक व चालक यांनी एकाच नंबर प्लेटचे दोन ट्रक वापरुन शासनाचा महसून बुडवून व दिशाभूल करुन शासनाची फसवणूक केल्याचे आढळून आले. दोन ट्रक पांढरी रेती व दोन्ही ट्रकच्या नंबर प्लेट असा एकूण ७५ लाख २१ हजार २५० रु.चा माल जप्त करण्यात आला. याप्रकरणी कलम ३८१(४), ३३६(३) ३४०(२) ३०३(२)३(५) विविध कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांचे मार्गदर्शनात तपास अधिकारी पोलिस उपनिरिक्षक प्रितम निमगडे, पोलिस निरीक्षक देवेंद्र ठाकूर, स.फौ निरंजन वरभे, जावेद धामिया, तुषार भुते, मंगेश राऊत, गंगाधर तांबारे, दिनेश चव्हाण आदींनी केली.

# खुर्चीला फेविकॉलचा जोड? जिल्ह्यातील ४ ही उपविभागीय कार्यालयांत १० वर्षांचा मुक्काम आणि लक्ष्मीदर्शनाचा खेळ!

## पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल सिस्टीमची स्वच्छता करणार का?

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. २५**

वर्धा जिल्हा पोलीस दलात सध्या मोठ्या प्रशासकीय उलथापालथीचे वारे वाहत असतानाच, यंत्रणेतील एक भीषण आणि संतापजनक वास्तव चव्हाट्यावर आले आहे. कारंजा घाडगे येथील अंमली पदार्थ प्रकरणाच्या धक्क्यानंतर माजी पोलीस अधीक्षक अनुराग जैन यांची अवघ्या वर्षभरात बदली झाली आणि जिल्ह्याची धुरा नवनयुक्त पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्याकडे सोपवण्यात आली. अग्रवाल यांनी पदभार स्वीकारताच सर्वात आधी स्वतःच्या कार्यालयातील आणि अंगरक्षक पथकातील कर्मचाऱ्यांची बदली करून शिस्तीचा संदेश दिला खरा, पण प्रत्यक्षात ज्यांना या पदावरून हटवण्यात आले, त्यांचे 'अदृश्य हात' आजही पोलीस दलात साहेबांच्या नावाचा गैरवापर करून दहशतीचे साम्राज्य निर्माण करत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे.



भीषण वास्तविकता अशी की, पोलीस अधीक्षकांनी ज्यांना आपल्या ताफ्यातून बाजूला केले, ते कर्मचारी आजही त्याच जुन्या आविर्भावात वावरत आहेत. 'आम्ही साहेबांच्या जवळचे होतो आणि आजही आहोत,' असा अप्रत्यक्ष संदेश देऊन हे कर्मचारी विविध पोलीस ठाण्यांमधील कनिष्ठांवर आणि अवैध व्यावसायिकांवर दबाव तंत्राचा वापर करत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, हे 'माजी' अंगरक्षक स्वतःचे आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी अवैध व्यावसायिकांना थेट फोनवरून धमकावत असून, 'माझे मीटर बंद केल्यास साहेबांना सांगून तुझ्यावर मोठी रेड टाकायला लावीन,' असा सज्जड दम भरत आहेत. 'साहेबांना सांगून तुझी मुख्यालयात बदली करून टाकीन,' अशी भीती पोलीस कर्मचाऱ्यांना दाखवून स्वतःसाठी अवैध रसद गोळा करण्याचा हा प्रकार पोलीस विभागाची प्रतिमा मलिन करणारा आहे. साहेबांच्या विश्वासाचा आणि नावाचा असा बाजार मांडणाऱ्या या प्रवृत्तीमुळे पोलीस दलातील प्रामाणिक अधिकारी आणि कर्मचारी वर्गात तीव्र संतापाची लाट आहे.

दुसरीकडे, जिल्ह्यातील वर्धा, हिंगणघाट, आर्वी आणि पुलगाव याचारही उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयांमध्ये (एउझ्ध ध्मे) शासन निर्णयाची सर्रास पायमल्ली केली जात आहे. शासकीय नियमानुसार कोणत्याही कर्मचाऱ्याला एकाच ठिकाणी ५ वर्षांपेक्षा जास्त काळ ठेवता येत नाही, मात्र जिल्ह्यात चित्र याच्या अगदी उलट आणि धक्कादायक आहे. येथे काही 'मर्जीतील' कर्मचारी गेल्या ८, १० आणि चक्क १२ वर्षांपासून एकाच खुर्चीला फेविकॉलसारखे चिटकून बसले आहेत. हे कर्मचारी केवळ प्रशासकीय कामात तरबेज आहेत म्हणून तिथे नाहीत, तर संबंधित कार्यक्षेत्रातील अवैध धंदेवाले, वाळू माफिया आणि सट्टेबाजांशी त्यांचे असलेले 'अर्थपूर्ण' लागेबांधे हेच त्यांच्या दीर्घायुष्याचे गुपित असल्याचे बोलले जाते. भीषण वास्तव असे की, जेव्हा जिल्हा मुख्यालय किंवा स्थानिक गुन्हे शाखेची (थ्ञ्) टीम एखाद्या गुन्हेगारावर किंवा अवैध अड्ड्यावर छापा टाकण्याचे नियोजन करते, तेव्हा याच उपविभागीय कार्यालयांतील 'खबरी' कर्मचारी संबंधित अवैध व्यावसायिकांना आधीच माहिती देऊन कारवाईतून वाचवतात. कारवाईपूर्वीच माहिती 'लीक' होत असल्याने पोलीस रिकाम्या हाताने परततात आणि खाकी वर्दीची नाचक्की होते. कारंजा घाडगे येथील ड्रग्ज रॅकेट इतका काळ फोफावण्यामागे अशाच अंतर्गत यंत्रणेचे तर अभय नव्हते ना? असा संशयास्पद प्रश्न आता उपस्थित होत आहे.

या 'मलिदा गँग'च्या मुजोरीमुळे पोलीस स्टेशन स्तरावर रात्रंदिवस राबणाऱ्या, गुन्हेप्रकटीकरण पथकात (ॐ) कसब दाखवणाऱ्या आणि गोपनीय विभागात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मनोबल रसातळाला गेले आहे. केवळ आर्थिक साखळी अबाधित ठेवण्यासाठी आणि दरमहा मोठ्या 'लक्ष्मीदर्शना'साठी या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ पातळीवरून अभय दिले जात असल्याची चर्चा आता पोलीस दलात दबक्या आवाजात सुरू आहे. पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांची ओळख एक अत्यंत शिस्तप्रिय आणि कडक अधिकारी म्हणून आहे. त्यांनी स्वतःचे अंगरक्षक बदलून बदलाची नांदी तर केली आहे, पण त्यांच्या नावाचा वापर करून अवैध रसद गोळा करणारे 'माजी' विश्वासू आणि चारही उपविभागीय कार्यालयांत दशकांपासून ठाण मांडून बसलेली 'वाळवी' यांवर ते कधी सर्जिकल स्ट्राईक करणार? याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. सध्या तरी वर्धा पोलीस दलात 'नियम फक्त कागदावर आणि मर्जी फक्त खुर्चीवर' असेच चित्र पाहायला मिळत आहे.

# रस्त्याच्या कामात चोरीच्या गौण खनिजाचा वापर

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आष्टी(श), दि. २५**

तालुक्यातील माणिकवाडा ग्रामपंचायतच्या हद्दीत जामगांव येथे सुरु असलेले वादग्रस्त रस्त्याचे बांधकाम हे निकृष्ट दर्जाचे असून या कामात विना परवानगी गौण खनिज चोरून आणून रस्त्याच्या कामात वापरण्यात येत असल्यामुळे महसूल विभागाचा लाखो रुपयाचा महसूल बुडविला जात आहे. या गंभीर प्रकरणाची चौकशी करीत संबंधित कंत्राटदारावर कारवाई करावी, अशी मागणी जामगांव येथील उपसरपंच अंकित कावळे यांनी जि.प. बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंत्याकडे तक्रारीतून केली आहे.

सविस्तर असेकि, माणिकवाडा ग्रामपंचायत हद्दीतील जामगांव या गावात डीपीडीसी या हेडखाली तीस लाख रुपये चे बांधकाम होत आहे. सुरु असलेले बांधकामं हे अंदाज पत्रकाप्रमाणे होत नसून थातूर मातुर होत आहे. येथील काम करण्यासाठी



कोणतीही रॉयल्टी न घेता व ज्या ठिकाणावरून मुरूम खोदण्यात येत आहे. ते ठिकाण शासकीय जमीन आहे. मुरूम वाहतूक करताना महसूल विभागाच्या सर्व परवानग्या घेऊन गौण खनिज उपसा करणे गरजेचे आहे. महसूल विभागाचे व वनविभागाचे सर्व नियम धाब्यावर बसवून रात्री ला गौण खनिज चोरून आणला जातो. या बाबीला तहसीलदार आष्टी यांची मुकसंमती असल्याने उघडपणे महसूल मालमत्तेची चोरी होत असल्याचे दिसून येते. रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे होत असताना उपसरपंच अंकित कावळे यांनी मुख्य अभियंता जिल्हा परिषद वर्धा यांना तक्रारी दिल्यावर घटनास्थळ पाहण्यासाठी दिवटे हे अभियंता व सोबत खरबडे हे सुद्धा आले होते. काम बोगस होत आहे अशी समज दिल्यावरही ठेकेदाराने काम सुरुच ठेवले. दोन दिवसापासून सुरु असलेले काम बोगस होत आहे म्हणून अधिका-यांना कळविले आहे. कामात सुधारणा होत नाही म्हणून पुन्हा तक्रार करण्यात आली. गौण खनिज चोरून आणून काम करीत आहे. या घटनेची सुद्धा तक्रार महसूल विभागाला दिली आहे. चौकशी करून कार्यवाही होणार नसेल तर मोठे जण आंदोलन छेडणार असे कावळे यांनी म्हटले आहे. बोगस काम थांबवा अशी मागणी त्यांनी निवेदन देऊन केली.

## मैक्स हॉस्पिटल नागपूरने गोंदियामध्ये मल्टी-स्पेशालिटी ओपीडी सेवा सुरू केली



**गोंदिया, २५ जानेवारी :** मैक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटल, नागपूर यांनी आज गोंदिया येथील शारदा कॉलनी मधील रामायण हॉस्पिटलच्या सहकार्याने सीटीव्हीएस (हृदय शस्त्रक्रिया), गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी (पचनसंस्था) आणि ऑन्कोलॉजी (कर्करोग) या विभागांसाठी विशेष ओपीडी सेवा सुरू केल्याची घोषणा केली आहे. या ओपीडी सेवांचा उद्घाटन कार्यक्रम मैक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटल, नागपूर येथील डॉ. निलेश अग्रवाल (असोसिएट डायरेक्टर, सीटीव्हीएस), डॉ. सौरभ पटले (प्रिन्सिपल कन्सल्टंट, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी) आणि डॉ. कवडू जवादे (कन्सल्टंट, सर्जिकल ऑन्कोलॉजी) यांच्या उपस्थितीत पार पडला. डॉ. निलेश अग्रवाल, डॉ. सौरभ पटले आणि डॉ. कवडू जवादे हे दर महिन्याच्या चौथ्या शुक्रवारी सकाळी ११:०० ते दुपारी २:०० या वेळेत प्राथमिक सल्ला आणि फॉलो-अप तपासणीसाठी उपलब्ध असतील.

डॉ. निलेश अग्रवाल, असोसिएट डायरेक्टर -सीटीव्हीएस, मैक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटल, नागपूर, म्हणाले, गेल्या दहा वर्षांत हृदयशस्त्रक्रियेत मोठा बदल झाला आहे. त्यामुळे हृदयाच्या विविध आजारांवर आता रुग्णांना अधिक सुरक्षित, अचूक आणि प्रभावी उपचार उपलब्ध झाले आहेत. पारंपरिक ओपन-हार्ट शस्त्रक्रियेपासून ते आधुनिक मिनिमली इनव्हेसिव्ह आणि हायब्रिड पद्धतींपर्यंत, आजची हृदय शस्त्रक्रिया प्रत्येक रुग्णाची स्थिती, वय आणि एकूण आरोग्य लक्षात घेऊन केली जाते. आमचा भर केवळ शस्त्रक्रियेच्या यशावर नाही, तर लवकर निदान, योग्य वेळी उपचार, लवकर बरे होणे आणि दीर्घकालीन जीवनमान सुधारण्यावरही आहे. गोंदियातील या ओपीडीच्या माध्यमातून, रुग्णांना तज्ज्ञ हृदय शस्त्रक्रियेचा सल्ला सहज उपलब्ध करून देणे हे आमचे उद्दिष्ट आहे, जेणेकरून त्यांना उपचारांसाठी दूर प्रवास न करता योग्य वेळी योग्य उपचार मिळू शकतील.

डॉ. सौरभ पटले, प्रिन्सिपल कन्सल्टंट - गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, हेपॅटोलॉजी आणि एंडोस्कोपी, मैक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटल, नागपूर, म्हणाले, वेळेत निदान झाले तर पचनसंस्थेशी संबंधित अनेक आजार टाळता येतात. आमच्या नवीन गॅस्ट्रो ओपीडीच्या माध्यमातून प्रत्येक रुग्णाला सोयीस्कर, आधुनिक आणि काळजीपूर्वक उपचार देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. या ओपीडी सेवांमुळे रुग्णांना घराजवळच उच्च दर्जाचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी उपचार मिळतील आणि गरज असलेल्या रुग्णांना वेळेवर आणि प्रभावी उपचार मिळू शकतील.

गोंदियामध्ये या विशेष ओपीडी सेवा सुरू केल्यामुळे मैक्स सुपर स्पेशियलिटी हॉस्पिटल, नागपूरने मेट्रो शहरांव्यतिरिक्त इतर ठिकाणीही विशेष आरोग्यसेवा पोहोचवण्याची आपली बांधिलकी पुन्हा अधोरेखित केली आहे. या उपक्रमाचा उद्देश सीटीव्हीएस, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी आणि सर्जिकल ऑन्कोलॉजीमध्ये लवकर निदान आणि तज्ज्ञ उपचार यांमधील अंतर कमी करणे हा आहे. यामुळे गोंदिया आणि आसपासच्या भागातील रुग्णांना दूर प्रवास न करता घराजवळच वेळेवर व उच्च दर्जाची उपचारसेवा मिळवणे शक्य होईल.

## रणबीर कपूर सोबत 'पीएनजी ज्वेलर्स'चा 'परंपरा आणि आधुनिकते'चा नवा अध्याय सुरू



**नागपूर, २५ जानेवारी :** १८३२ पासूनचा समृद्ध वारसा जपणारा भारतातील एक अग्रगण्य दागिन्यांचा ब्रँड 'पीएनजी ज्वेलर्स'ने बॉलिवूडचा लोकप्रिय अभिनेता रणबीर कपूर याची नवा ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. परंपरेची जाण, आकर्षकता आणि विश्वासार्हता यांचा सहज संगम असलेला रणबीर कपूर 'पीएनजी ज्वेलर्स'च्या प्रवासातील एक रोमांचक नवा अध्याय ठरणार असून, यामुळे ब्रँडची राष्ट्रीय पातळीवरील उपस्थिती अधिक भक्कम करणार आहे. महाराष्ट्राच्या मातीतून सुरू झालेले आणि आज भारतासह आंतरराष्ट्रीय स्तरावर आत्मविश्वासाने विस्तार करत असलेले 'पीएनजी ज्वेलर्स' डॉ. सौरभ गाडगीळ यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहे. रणबीर कपूरसोबतची ही भागीदारी ब्रँडच्या उत्क्रांतीचे प्रतीक असून, विश्वास, कारागिरी आणि वारसा या मूल्यांशी असलेली नाळ अधिक दृढ करते. बॉलिवूडच्या दिग्गज कपूर घराण्याची परंपरा पुढे नेत, रणबीर कपूरने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. रणबीरचा प्रचंड चाहतावर्ग आणि सिनेसृष्टीतील वारसा 'पीएनजी ज्वेलर्स'च्या विविध वयोगटांतील ग्राहकांपर्यंत पोहोच वाढवण्यासाठी महत्त्वाचा ठरणार आहे.

या सहकार्याविषयी बोलताना अभिनेता रणबीर कपूर म्हणाला, पीएनजी ज्वेलर्स हा पिढ्यान्पिढ्यांचा वारसा जपणारा आणि विश्वास व मूल्यांवर उभा असलेला ब्रँड आहे, ज्याचा मी मनापासून आदर करतो. परंपरेचा सन्मान करत भविष्याकडे आत्मविश्वासाने वाटचाल करणाऱ्या या ब्रँडचा भाग होणे माझ्यासाठी अतिशय आनंदाचा क्षण आहे आणि या प्रवासाचा मी अभिमानाने भाग बनत आहे. या सहकार्याद्वारे पीएनजी ज्वेलर्स आपली ओळख विश्वासाचे प्रतीक, विकसित होत असलेला वारसा आणि कालातीत सौंदर्य म्हणून अधिक मजबूत करत असून, परंपरा आणि आधुनिक भारत यांच्यातील एक सशक्त नाते निर्माण करत आहे.

## अदाणी ग्रीन एनर्जीची दमदार कामगिरी

**अहमदाबाद, २५ जानेवारी :** भारतातील सर्वात मोठी आणि वेगाने वाढणारी शुद्ध नवीकरणीय ऊर्जा कंपनी अदाणी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एजीईएल) ने ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपलेल्या कालावधीसाठी दमदार आर्थिक आणि कार्यात्मक कामगिरी जाहीर केली आहे. ९एम एफवाय२६ दरम्यान कंपनीच्या ऊर्जा विक्रीत वर्षानुवर्षे ३७% वाढ होऊन २७,६३६ दशलक्ष युनिट्स इतकी नोंद झाली. या उल्लेखनीय प्रगतीमुळे कंपनीने देशातील हरित ऊर्जा क्षेत्रातील आपले नेतृत्व अधिक बळकट केले आहे.

या कालावधीत कंपनीचा महसूल २५% वाढून ८,५०८ कोटी, तर ईबीआयटीडीए २४% वाढून ७,९२१ कोटी झाला आहे. उद्योगात आघाडीवर असलेला ९१.५% ईबीआयटीडीए मार्जिन कायम ठेवत एजीईएल ने कार्यक्षमतेचा उच्च दर्जा सिद्ध केला आहे. मजबूत आर्थिक निकालांना ग्रीनफिल्ड प्रकल्पांची वाढ, प्रगत तंत्रज्ञानाचा वापर आणि उत्कृष्ट ऑपरेशनल कामगिरी यांचा मोठा आधार मिळाला.

ऑपरेशनल पातळीवर, कंपनीची एकूण कार्यरत क्षमता ४८% वाढीसह १७.२ जीडब्ल्यू पर्यंत पोहोचली आहे. ९एम एफवाय२६ मध्येच २,९९५ मेगावॅट नवीन क्षमता जोडण्यात आली असून मागील वर्षभरात एकूण ५.६ जीडब्ल्यू ग्रीनफिल्ड क्षमता वाढ साध्य करण्यात आली आहे, जी देशातील सौर व पवन ऊर्जेच्या नव्या स्थापनेपैकी सुमारे १४% आहे. गुजरातमधील खावडा येथे विकसित होत असलेला ३० जीडब्ल्यू चा जगातील सर्वात मोठा नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प कंपनीच्या जलद अंमलबजावणीचे प्रतीक ठरत आहे. कंपनीच्या ऑपरेशन्स आणि देखभाल व्यवस्थेत डेटा ॲनालिटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि रोबोटिक तंत्रज्ञानाचा वापर करून ऊर्जा निर्मिती आणि प्लांट उपलब्धता वाढवली जात आहे. या तांत्रिक नवकल्पनांमुळे उत्पादन खर्चात घट होऊन उच्च नफा टिकवून ठेवणे शक्य झाले आहे. तसेच, एजीईएल ने वीज खरेदी करारांनुसार (पीपीए) निर्धारित बांधिलकीपेक्षा जास्त वीज निर्मिती करत सातत्यपूर्ण कामगिरी नोंदवली आहे. आशिष खन्ना, मुख्य कार्यकारी अधिकारी, अदाणी ग्रीन एनर्जी, म्हणाले, या वर्षात ५.६ जीडब्ल्यू नवीकरणीय क्षमता वाढवून आम्ही भारतातील हरित ऊर्जा क्षेत्रात आमचे नेतृत्व अधिक मजबूत केले आहे.

# टायगर रनमध्ये आबालवृद्ध धावले



युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

**नागपूर, दि. २५ :** अंमली पदार्थांच्या सेवनावर आळा आणि शारीरिक सुदृढता कायम रहावी या उद्देशाने शहर पोलिसांच्या वतीने काढण्यात आलेल्या टायगर रन-रन फ्रॉम ड्रग्ज, रन फॉर लाईव्ह मॅराथॉन स्पर्धेत आबालवृद्धांनी आपला सहभाग नोंदविला. २१, १०, ५ आणि ३ किमी अशा चार टप्प्यात ही स्पर्धा घेण्यात आली. शहर पोलिस मुख्यालयातून सुरू झालेल्या या मॅराथॉनला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. चार गटात विभागलेल्या या स्पर्धेत पहिल्या गटात ६० पेक्षा जास्त महिला व पुरुष, दुसऱ्या गटात ४० ते ६० वयोगटातील महिला पुरूष, तिसऱ्या गटात २५ ते ४० आणि चौथ्या गटात १६ ते २५ वयोगटातील स्पर्धकांनी भाग घेतला. २१ किमी स्पर्धेत केशव मोटे (प्रथम), दुसऱ्या गटात परसराम भोर्ज (प्रथम), मनोहर बारई (द्वितीय), ओमप्रकाश सिंग (तृतीय), महिलांमध्ये विद्या धापोडकर (प्रथम), प्राची कुकडे (द्वितीय) क्रमांक पटकाविला. तिसऱ्या गटात राजन यादव (प्रथम), लीलाराम बावणे (द्वितीय) अब्दुल सलाम (तृतीय), महिलांमध्ये प्राजक्ता गोडबोले (प्रथम), जयश्री पुजारा (द्वितीय), ए. के. भारती (तृतीय) हे विजयी झाले. चौथ्या गटात मुकेशकुमार (प्रथम), निखर भलावी (द्वितीय), कुणाल वाघ (तृतीय), महिलांमध्ये साक्षी जयदत्त (प्रथम), रामणी पटेल (द्वितीय) आणि निकिता शाहू (तृतीय) क्रमांकाने विजयी झाले. पोलिस विभागातून २१ किमी स्पर्धेत ४० वर्षांवरील स्पर्धेत बंडूसिंग जाधव (प्रथम), आशीर्वाद इंगळे (द्वितीय), पुरुषोत्तम इवनाते (तृतीय), ४० वर्षांखालील स्पर्धेत आकाश देशभ्रतार (प्रथम), रुपेश गायकवाड (द्वितीय), मनोज घोटेकर (तृतीय), महिला गटात प्रियंका पाल (प्रथम) आणि पल्लवी लिल्हारे (द्वितीय) क्रमांक पटकाविला. शहरातील विविध मार्गाने स्पर्धक धावल्यानंतर या स्पर्धेची पोलिस मुख्यालयात सांगता करण्यात आली. त्यानंतर यशस्वी स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली. याप्रसंगी पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंघल, बिनीता सिंघल, सहपोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, अप्पर पोलिस आयुक्त शिवाजीराव राठोड, वसंत परदेशी, क्रिकेटपटू जितेश शर्मा, तिरंदाज ओजस देवतळे, बॅडमिंटनपटू रितीका ठाकेर, ॲथलेट प्राची गोडबोले प्रामुख्याने उपस्थित होते.









### विवाहितेचे फोटो व्हायरल

**नागपूर, दि. २५ :** विवाहितेचे आक्षेपार्ह फोटो व्हायरल करणाऱ्या दोन भावंडांविरुद्ध हुडकेश्वर पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. संदीप हनुमान पांडे (३४) आणि नीरज पांडे (३०) रा. रीवा, मध्यप्रदेश अशी आरोपींची नावे आहेत.

### निधन वार्ता

**फत्तूजी भिवगडे**



**नागपूर, दि. २५ :** प्लॉट क्र. २०, जोगीनगर निवासी फत्तूजी भिवगडे यांचे निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ९४ वर्षे होते. उद्या सोमवारी सकाळी १० वाजता त्यांच्या निवासस्थानाहून अंत्ययात्रा निघेल आणि मानेवाडा घाटावर अंत्यसंस्कार पार पडेल.



























RNI NO. MAHMAR/ 2008/26657

This daily has been printed by Sagar Harishprasad Kothari, printer and publisher on behalf of Shri Sai Prakashan, Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and has been published at Yuvarashtra Darshan office, Opposite Old Navbharat, Cotton Market, Nagpur 440018. **Editor:** Sagar Harishprasad Kothari (responsible for editorial as per PRB act). The editor might not necessarily agree with the content published in the newspaper. Disputes if arising, shall be settled under the jurisdiction of Nagpur based courts. Group Editor : Sandeep Ramrao Kale Office Phone No: 7447735851

RNI NO. MAHMAR/ 2008/26657

हे पत्र मालक श्री. साई प्रकाशनकरिता मुद्रक, प्रकाशक - सागर हरिषप्रसाद कोठारी यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून युवाराष्ट्र दर्शन कार्यालय, जुना नवभारत समोर, कॉटन मार्केट, नागपूर ४४००१८ येथे प्रसिद्ध केले. संपादक : सागर हरिषप्रसाद कोठारी (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर) वृत्तपत्रातील मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. कुठलाही वाद नागपूर न्यायालयांतर्गत. समूह संपादक : संदीप रामराव काळे. कार्यालय फोन : ७४४७७३५८५१